दै. पुण्यनगरी दि. 25-11-23



# १२ तलवारी व ११ खंजर बाळगणारा आरोपी 'स्थागुशा' च्या जाळ्यात



**नांदेड/प्रतिनिधी**

शहरातील नगिना घाट भागात एका जनरल स्टोअर्सवर धाड टाकून स्थानिक गुन्हे शाखा पथकाने एकास ताब्यात घेतले आहे. या धाडीत १२ तलवारी, ११ खंजर जप्त करण्यात आले आहेत.

जिल्ह्यातीलगुन्हेगारीवर नियंत्रण मिळविण्यासाठी अवैध शस्त्र बाळगणाऱ्या आरोपींची माहिती काढून कारवाई करण्याचे आदेश जिल्हा पोलिस अधीक्षकांनी दिले आहेत. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक उदय खंडेराय यांनी शहरात अवैध अग्नीशस्त्र बाळगणारे, विक्री करणाऱ्यांविरुध्द तपासणी मोहीम सुरु केली.

दि.२३ नोव्हेंबर रोजी स्थागूशा पथकास सतर्कता जनरल स्टोअर्स नगीनाघाट नांदेड येथे १ इसम अवैध तलवारी व खंजर विक्रीसाठी बाळगून असल्याची माहिती मिळाली. या माहितीच्या आधारे या पथकाने आरोपी परमजितसिंघ महेंद्रसिंघ रामगडिया ४० नंदिग्राम सोसायटी नांदेड याला ताब्यात घेतले व दुकानाची तपासणी केली असता दुकानात १२ तलवारी व ११ खंजर आढळून आले. त्याच्याविरुध्द पोलीस ठाणे वजीराबाद गुरनं. ५३६/२०२३ कलम ४/२५ दाखल करण्यात आला आहे. नमुद आरोपीस पोलीस ठाणे वजीराबाद यांच्या ताब्यात देण्यात आले आहे

पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अपर पोलीस अधिकारी अविनाश कुमार, अपर पोलीस अधीक्षक खंडेराव धरणे यांच्या मार्गदर्शनात ही कारवाई स्थागुशाचे पोलिस निरीक्षक उदय खंडेराय,उपनिरीक्षक परमेश्वर चव्हाण, पोहेकाँ शंकर म्हैसनवाड, संभाजी मुंडे, ज्वालासिंघ बावरी, चालक कलीम शेख यांनी पार पाडली.